# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
## पर्यावरण विभाग

## जाहिर आवाहन

**कृत्रिमरित्या / प्लास्टिकपासून बनविलेल्या नायलॉन मांजामुळे पक्षी व मानव जिवितांस इजा होण्याबाबत पर्यावरण (संरक्षण) कायदा,१९८६ च्या ५ अन्वये निर्देश.**

ज्याअर्थी मकरसंक्रांतीच्या सणावेळी पतंग उडविण्याकरिता प्लॉस्टिक किवां कृत्रिम वस्तुंचा वापर करुन बनविण्यात आलेल्या व सर्वसाधारणपणे " नायलॉन मांजा " या नावाने परिचित असलेल्या पक्क्या धाग्यामुळे पक्षी व मानवजिवितांस इजा पोहचली जाते. काही प्रसंगी त्या इजा प्राणघातक ठरतात. अशा प्रकारच्या धाग्यामुळे होणाऱ्या प्राणघातक इजांपासुन पक्षी व मानव जिवितांस संरक्षण करण्याची गरज आहे. त्याअर्थी, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम ५ अन्वये खालीलप्रमाणे नागरिकांना जाहिर आवाहन करणेत येत आहे.

१) प्लॉस्टिक किंवा इतर कृत्रिम वस्तुपासून बनविलेल्या " नायलॉन मांजा " या नावाने परिचित असलेल्या पक्क्या धाग्यांचा वापर पतंग उडविण्याकरिता मकरसंक्रांती सणावेळी करण्यात येतो. त्यामुळे पक्षांना व मानवी जिवितांस तीव्र इजा होण्याचा धोका असतो. अशा धाग्यांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे.

२) घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी तसेच साठवणुकदार यांनी तत्परतेने नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक थांबवावी ज्यायोगे संपूर्ण वर्षभरात त्यांची साठवणूक, हाताळणी व विक्री होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३) पतंग उडविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या अशा अविघटनशील नायलॉन मांजामुळे गुरांना उदभवणारा धोका, माती व पाण्याच्या गुणवत्तेची पातळी घसरणे तसेच एकंदरीत परिस्थितीत प्राणीजातीला उदभवणाऱ्या इजांना प्रतिबंध करणेकामी नागरिकांनी अशा नायलॉन मांजाचा वापर टाळावा.

४) पतंग उडवितांना केलेल्या मांजाच्या वापरामुळे विजेच्या तारांवर घर्षण होऊन आग लागणे,उपकेंद्रे बंद पडणे, वीज उपकरणे बिघडणे, असे अपघात घडू नये म्हणून नायलॉन मांजाचा वापर टाळावा.

**××××**
शहर अभियंता
भिवंडी नि. शहर महानगरपालिका,भिवंडी.